विकास भुजंगराव डावरे
वकील उच्च न्यायालय
**(बी.कॉम., बी.एल.एस., एल.एल.बी)**
[redacted] नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०९, ई-मेल:- vikasdaware@hotmail.com, दूरधवनी:- +९१९८६७३९८६१५

अनु. क्र. १११/वि. ली. रो/२०२० दिनांक:- ०६/०५/२०२०

**प्रति,**
**मा. मुख्यमंत्री**
**महाराष्ट्र राज्य,**
**मा. मुख्यमंत्री यांचे कार्यालय,**
**६वा मजला, मुख्य ईमारत,**
**मंत्रालय, डॉ. मादाम कामा रोड,**
**फोर्ट, मुंबई-४०००३२**
**दूरध्वनी:- ०२२-२२०२५१२५१/५२**
**फॅक्स:- ०२२-२२०२९२१४**

विषय:- दारू विक्री संदार्भाचा निर्णय व समाजातील सद्य परिस्थिती यावर ध्यान आकर्षित करणे बाबत.

संदर्भ:- १) कोविड-१९ २) दारू विक्री निर्णय ३) नोकरी, उद्योगधंदे.

**मा. मुख्यमंत्री जी नमस्कार,**
कोविड-१९ मुळे काही दिवसांपूर्वी संबंध देशभरात लॉकडाऊन घोषित केला गेला, त्याचबरोबर त्याच्या वाढत्या संसर्गाला लक्षात घेऊन ठरवला गेलेला लॉकडाऊन पुढील मुदतीपर्यंत वाढवलाही गेला, तसं करणं अपरिहार्य होतं यात तिळमात्र शंका नाही. महामारीच्या या संसर्गाबाबत आपण सर्वतोपरी काळजी घेत आहात, त्यामुळे या काळात आपण घेतलेले निर्णय कौतुकास्पद आहेत. परंतु राज्य शासनाच्या वतीने घेतल्या गेलेल्या एका निर्णयासंदर्भात आपल्याला हे पत्रं लिहीत आहे.

मा. मुख्यमंत्री जी, काही दिवसांपूर्वी शासनाद्वारे दारू विक्री सुरु करण्याबाबतचा निर्णय घेतला गेला, त्यामुळे वर्तमानातली परिस्थिती पाहता घरोघरी निर्माण होणाऱ्या भयावह परिस्थितीची कल्पना आली आणि न रहावून आपणास हे पत्रं लिहावेसे वाटले. प्रामुख्याने, राज्यात बहुंतांशी कुटुंब मध्यमवर्गीय आहेत, काही अती मध्यमवर्गीय तर अगदीच झोपडीत राहणारीही किल्येक कुटुंब आहेत हे आपण जाणतो. उच्च वर्गीय कुटुंबांचा इथं संदर्भ देणं अपेक्षित नाही कारण ते सक्षम आहेत. चिंता आहे ती नमूद केलेल्या वर्गांची, कारण यातील किल्येक जणांचे हातावरचे पोट आहे. बहुतांशी नोकरदार तर काही किरकोळ व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांचा सदरचा वर्ग आहे. मेहनत करून नेटानं प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या कर देणारा या वर्गातला नागरिक आहे. गेल्या किल्येक दिवसांपासून हा वर्ग घरातूनच त्यांच्या कार्यालयातील नेमून दिलेली कामे पूर्ण करत आहे. परंतु, कोविड-१९ च्या महामारीचा फटका जागतिक अर्थव्यवस्थेला बसला आहे बसत आहे याची आपणाला पूर्णतः कल्पना आहे, त्यामुळे राज्यातील

विकास भुजंगराव डावरे
वकील उच्च न्यायालय
**(बी.कॉम., बी.एल.एस., एल.एल.बी)**
[redacted] नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०९, ई-मेल:- vikasdaware@hotmail.com, दूरधवनी:- +९१९८६७३९८६१५

रोजंदारी, नोकऱ्या आणि व्यवसायांच्या सद्य परिस्थिती बाबत आपण जाणते आहात. यातच एक हताश करून टाकणारं चित्रं म्हणजे कोविड-१९ वर अद्याप कोणत्याही प्रकारची लस वा औषध उपलब्ध नाही, ते उपलब्ध करण्याच्या दृष्टीने बऱ्याच हालचाली केंद्र स्तर आणि काही संशोधक आस्थापनांच्या माध्यमातून होताना दिसतात परंतु या आजारासंदर्भातील औषध अद्याप नाही हे वास्तव नाकारता येत नाही. त्याचबरोबर ही महामारी राज्यात आणि देशात आणखी किती दिवस मुक्काम ठोकून बसणार आहे याचीही कुणाला कल्पना नाही. अशीच परिस्थिती जर कायम राहिली तर राज्यातील उद्योगधंदे डबघाईला येतील, पर्यायाने कित्येक नोकऱ्या जाऊन कुटुंब च्या कुटूंब रस्त्यावर येतील ही चिंता मनाला भेडसावणारी आहे.

मा. मुख्यमंत्री जी, अश्याच बिकट परिस्थितीत आपण एक निर्णय घेतला तो म्हणजे दारू विक्री पुन्हा सुरु करण्याचा. वरील नमूद सर्व परिस्थितींचा विचार करता सर्वांवर घरात राहण्याचं बंधन आहे, कोविड-१९ मुळे आज प्रत्येक जण निराश आहे हताश आहे, अश्याच परिस्थितीत जर आपण दारू विक्रीच्या निर्णयाबाबतचा विचार केला तर काही कुटुंबांवर संकटरूपी वादळ येताना दिसतं हे नक्कीच. शासनाने दारू विक्री संदर्भातला निर्णय घेताना सारासार विचार न करता एकतर्फी बाजूंचा विचार केल्याचं प्रकर्षानं जाणवतं त्यामुळे दारू विक्रीच्या निर्णयाचा समाजावर होणाऱ्या परिणामांचीही चिंता करणं गरजेचं ठरतं. दारू विक्रीचा निर्णय समाजावर नकारार्थी त्याचबरोबर घातक परिणाम करणारा आहे हे नक्कीच परंतु कोविड-१९ संदर्भात योग्य तो निर्णय न घेतला गेल्यास उद्योगधंदे आणि पर्यायानं नोकऱ्या, रोजंदारीवर याचा गंभीर परिणाम होऊ शकतो हे हि तितकेच खरे. उदाहरणादाखल द्यायचे झालेच तर दारू विक्री मुळे घरगुती हिंसाचाराच्या प्रमाणात लक्षणीय वाढ होण्याची दाट शक्यता आहे यातील कित्येक प्रकरणं रिपोर्ट होतील ना होतील हा प्रश्न दुय्यम परंतु घरघुती हिंसाचाराची टांगती तलवार काही कुटुंबांवर राहील हे नक्कीच, दुसरं आणि अत्यंत महत्वाचं म्हणजे लॉकडाऊन, सामाजिक अंतर ठेवण्याच्या नियमावलीला जाणते अजाणतेपणी बगल देण्याचं सत्र सुरु होऊ शकतं. त्यामुळे शासनाद्वारे घेतला गेलेला निर्णय अनेक कुटुंबांना चटका देणारा ठरू शकतो याबाबत आपण चिंता करावी असं वाटतं.

मा. मुख्यमंत्री जी, व्यासायिक आस्थापनांत काम करण्यास, बसण्यास, वावरण्यास पुरेशी जागा असणं बंधनकारक असतं, त्यामुळे वरील सर्व प्रश्नांना माझ्या लेखी एकच उत्तर आहे, ते म्हणजे सामाजिक अंतर ची नियमावली अधिक कडक करून व्यावसायिक आस्थापनांमध्ये कामगार व इतर कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणेच परंतु शासनाच्या नियमावलीत राहून त्याचे पालन करून काम करण्याची मुभा देणे.

विकास भुजंगराव डावरे
वकील उच्च न्यायालय
**(बी.कॉम., बी.एल.एस., एल.एल.बी)**
[redacted]नवी मुंबई, महाराष्ट्र-४००७०९, ई-मेल:- vikasdaware@hotmail.com, दूरध्वनी:- +९१९८६७३९८६१५

मा. मुख्यमंत्री जी, महामारीचा हा काळ अजून किती वेळ जगांत वास्तव्य करेल याची चिंता न करता महामारी रोधक उपायांना चालना देऊन उद्योगधंदे कोविड-१९ संदर्भातील नियमांच्या चौकटीत बसवून जनजीवन पुन्हा सुरळीतपणे सुरु करणं अपरिहार्यच नव्हे तर काळाची गरज आहे असं मला वाटतं. राज्याच्या प्रगती साठी दारू विक्रीने नाही तर अनेक उद्योगधंद्यांनी, कामगारांनी, कर्मचाऱ्यांनी मेहनतीच्या जोरावर या राज्याच्या विकासाचा पाया मजबूत करून त्यावर सर्वांगीण प्रगतीची इमारत उभी केली आहे, करत आहेत हे वास्तव आहे. दारू विक्रीचा निर्णय समाजावर नकारार्थी प्रभाव पाडणारा असून मन हताश करणारा आहे. कोविड-१९ च्या दहशतीत राहून उपासमार करण्यापेक्षा नोकरी, व्यवसायांत मेहनत करून आपल्या कुटुंबाला परिणामी देशाला सुखवणं कुणीही जास्त पसंत करेल असं मला वाटतं. त्यामुळे, दारू विक्रीचा निर्णय लॉकडाऊन संपेपर्यंत तूर्तास मागे घेऊन, कोविड-१९ संदर्भात उद्योगधंदे, नोकऱ्या, रोजंदारीला केंद्रस्थानी ठेऊन योग्य तो निर्णय घ्यावा अशी विनंती मी आपणास करतो.

धन्यवाद,

Adv Vikas Daware

Digitally signed by Adv Vikas Daware
DN: cn=Adv Vikas Daware, o=V Daware's Legal Rostrum, ou=Law Firm, email=vikasdaware@hotmail.com, c=IN
Date: 2020.05.06 17:58:27 +05'30'

आपला विनीत,
विकास डावरे